नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०१/२०२६ (बुधवार )**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद ३८ गोवंश जनावरांची सुटका, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी बेला पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी सदर वाहन शोध कामी पेट्रोलींग केली असता मौजा खातखेडा शिवार, सिर्सी येथे एक संशयीत टाटा कंपनीचा आयसर वाहन क्र. एम एच ४९ ए टी २७८१ हे वाहन दिसुन आले. पोलीसांना पाहुन सदर वाहन चालकाने त्याचे वाहन पळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संशय अधिक बळावल्याने पोलीसांनी नमुद वाहनाचा पाठलाग केला असता आरोपी चालक वाहन सोडून पळून गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ३८ गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा कंपनीचा आयसर वाहन क्रमांक** एम एच ४९ ए टी २७८१ **किंमती १५,००,०००/— रूपये आणि ३८ गोवंश जनावरे किंमती २,८२,०००/— रूपये असा एकुण किंमती १७,८२,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या गोवंश जनावरांना देखभालीसाठी औंदुबर गौरक्षण संस्था, रूई खैरी, येथे दाखल करण्यात आले आहे.**

नुमद प्रकरणी वाहन चालक आणि मालक आरोपींविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना मा.पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी जाहीर केले बक्षीस

दिनांक ०७/०१/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील उत्कृष्ट कामगिरी करणारे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांना बक्षीसे जाहीर केली. **यामध्ये श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री रमेश नत्थुजी ताजने, नेम. पोलीस स्टेशन कुही यांना त्यांनी पोलीस खात्यात दिलेल्या गुणवत्तापूर्वक सेवेसाठी माननीय राष्ट्रपती, भारत सरकार, यांच्या कडून गुणवत्तापूर्व सेवा पदक जाहीर झाल्याने तसेच चालक पोलीस हवालदार श्री राजेश नत्थुजी सोनटक्के ,ब.नं ३२५ नेम. मोटर परिवहन विभाग, नागपुर ग्रामीण यांना विशेष सेवा पदक जाहीर झाल्याने यांना प्रोत्साहनार्थ बक्षीसे जाहीर केले.**

उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय उमरेड, पोलीस स्टेशन मौदा, पोलस स्टेशन कळमेश्वर येथील अधिकारी आणि अंमलदारांना चोरी, घरफोडीचे गुन्हे उघडकीस

आणल्याबाबत, अवैध जनावरे, अवैध रेती तस्करी, अंमली पदार्थांबाबत अवैध धंदयांवर कारवाई केल्याने तसेच आर्थिक गुन्हे शाखा येथील अधिकारी/अंमलदारांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबाबत प्रोत्साहनार्थ बक्षीसे जाहीर केली आहे.

**नमुद अधिकारी आणि अंमलदार यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरी साठी तसेच भविष्यात सुध्दा अशीच कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन म्हणुन बक्षीसे जाहीर करण्यात आली आहे.**

## भुतबाधा असल्याची भिती दाखवुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक

**पोलीस स्टेशन वेलतुर :—** पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी फिर्यादी गोंविदा विठ्ठल बावणकर, ३१ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२, वेलतुर, ता. कुही जिल्हा नागपुर, ह. मु. उदना जि. सुरत राज्य गुजरात यांनी पोलीस स्टेशन वेलतुर येथे तक्रार दिली की, दिनांक २३/०९/२०२५ ते दिनांक ०८/१०/२०२५ दरम्यान वेलतुर येथील फिर्यादीच्या घरी आलेल्या ईसम नामे संदीप वाघमारे व रविंद्र वाघमारे, रा. पालोरा, पारशिवनी, जि. नागपुर यांनी फिर्यादीला भुत बाधा असल्याची भिती दाखवुन भुत बाधा घालवण्याकरिता तांत्रिक पुजा करून फिर्यादीला जडीबुटी घेण्यास भाग पाडुन फिर्यादीची १,४५,५००/— रूपयाची आर्थिक फसवणुक केली आहे. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन वेलतुर येथे कलम ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ सहकलम ३(२) महाराष्ट्र जादूटोणा अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा नोंद केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात वेलतुर पोलीसांनी गुन्ह्याची माहिती प्राप्त होताच गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक ०६/०१/२०२६ रोजी तत्परतेने **आरोपी नामे १) संदीप गोविंदा वाघमारे वय २७ वर्षे ,२) रविंद्र नंदु वाघमारे, वय २५ वर्षे, दोन्ही रा. पालोरा ता. पारशिवनी जिल्हा नागपुर यांना** लाखणी, जि भंडारा येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आली.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात येत आहे 'रेझिंग डे' सप्ताह

२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापने निमित्य वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी रेझिंग डे' सप्तहा अंतर्गत नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे विविध उपक्रम घेण्यात आले आहे.

**विदयार्थ्यांना मार्गदर्शन**

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत प्रकाश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कांदरी ता. रामटेक येथे भेट देवुन विदयार्थ्यांसोबत संवाद साधुन त्यांना सायबर क्राईम, डायल – ११२ प्रकल्प, गुड टच बॅड टच, वाहतुकीचे नियम, सोशल मीडिया वापर, तसेच इतर विषयांबद्दल मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली आहे.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने